//

गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत - स्पष्टीकरणात्मक सूचना.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: १२ नोव्हेंबर, २०१८

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर,२०१८
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्रमांक १९/डीटीई/परदेशी शिष्यवृत्ती/ २०१८/१५३, दिनांक २६ ऑक्टोबर,२०१८

प्रस्तावना :-

गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे ही योजना संदर्भाधिन दिनांक ४ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी काही मुद्दयांबाबत स्पष्टता येणे आवश्यक होते. याकरीता संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधिन दिनांक २६ ऑक्टोबर,२०१८ च्या पत्राव्दारे शासनास प्रस्ताव सादर केला होता.

शासन परिपत्रक : -

गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे या योजनेंतर्गत उपस्थित होणा-या मुदयांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात येत आहे :-

| मुद्दा क्र. | मुद्दा | याबाबत करावयाच्या कार्यवाहीचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | अर्ज करीत असलेले बहुतांश उमेदवार या वेळेस त्यांनी प्रवेश | विभागीय कार्यालयात प्रमाणपत्र पडताळणीसाठी उमेदवारास मूळ प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| | घेतलेल्या परदेशी विद्यापीठात आहेत व शैक्षणिक संबंधित मूळ प्रमाणपत्र (एसएससी, एचएससी, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र, विद्यापीठाचे मूळ ऑफर लेटर इत्यादी) त्यांचे सोबत परदेशात आहेत किंवा त्यांनी प्रवेशित विद्यापीठाकडे सादर केले आहेत. प्रमाणपत्र पडताळणीसाठी विभागीय कार्यालयात सादर करू शकत नाही. | सादर करणे बंधनकारक आहे. या अभावी अर्ज स्वीकृतीची कार्यवाही पूर्ण करण्यात येत नाही. मूळ प्रमाणपत्र सादर करू शकत नसल्यास -<br><br>पर्याय १ : परदेशातील भारतीय दूतावासातून प्रमाणपत्राच्या प्रती नोटरी करून घेतल्यास किंवा सोय उपलब्ध असल्यास परदेशातील नोटरी कडून प्रमाणित करून घेतल्यास अशा नोटरी केलेल्या प्रती उमेदवाराने पोस्टाने त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे पाठवाव्यात. त्यांनी ही कागदपत्रे संबंधित विभागीय कार्यालयास अंतिम दिनांकापूर्वी सादर करून अर्ज स्वीकृतीची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी.<br><br>पर्याय २ : उमेदवाराने प्रवेश घेतलेल्या परदेशी विद्यापीठाने शैक्षणिक संबंधित मूळ प्रमाणपत्र (एसएससी,एचएससी, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका, प्रमाणपत्र इत्यादी ) त्यांचे कडे ठेवून घेतले असल्यास त्या विद्यापीठाने संबंधित मूळ प्रमाणपत्र / प्रमाणपत्रे विद्यापीठाकडे असल्याचे प्रमाणित करावे व प्रमाणपत्रांच्या प्रतीवर सत्य प्रत असे प्रमाणित करावे. प्रमाणित केलेली यादी व या प्रमाणित केलेल्या प्रती नोटरी करुन उमेदवाराने पोस्टाने त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे पाठवाव्यात. त्यांनी ही कागदपत्रे संबंधित विभागीय कार्यालयास अंतिम दिनंकापूर्वी सादर करून अर्ज स्वीकृतीची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| २ | अर्ज करीत असलेले बहुतांश उमेदवार या वेळेस त्यांनी प्रवेश घेतलेल्या परदेशी विद्यापीठात शिक्षण घेत आहेत व ते पासपोर्ट,व्हिसा,पडताळणीसाठी पाठवू शकत नाही. | सध्या विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत असल्यास पासपोर्ट व व्हिसा यांच्या प्रती स्वसाक्षांकित / साक्षांकित करुन जमा कराव्यात. त्यासाठी नोटरी करण्याची आवश्यकता नाही. |
| ३ | उमेदवाराकडे परदेशातील विद्यापीठाचे सन २०१८ मधील ऑफर लेटर आहे तथापि पुढील सत्रात प्रवेश घेण्यास मुदत दिली आहे ग्राह्य धरावे किंवा कसे. | उमेदवारास परदेशातील विद्यापीठाने सन २०१८ मधील ऑफर लेटर दिले असल्यास व पुढील सत्रात प्रवेश घेण्यास मुदत दिली असल्यास ऑफर लेटर ग्राह्य धरण्यात येईल व असा विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र असेल. |
| ४ | शैक्षणिक अर्हता:<br>१. परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान ६०% गुणांसहित पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>२. पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान ६०% गुणांसहित पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>अशी शासन निर्णयात तरतूद आहे.<br><br>उमेदवाराने NIT,IIT,IISc,IISER | उमेदवाराने NIT,IIT,IISc,IISER इत्यादी केंद्र अथवा राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थामधून शैक्षणिक अर्हता निर्धारित गुणासह उत्तीर्ण केली असल्यास त्यास अर्ज करण्यास पात्र समण्यात येईल.<br><br>ज्या संस्थेमध्ये Duel Degree Programe असेल व फक्त पदव्युत्तर पदवी प्रदान करण्यात येत असेल व पदवी करिता स्वतंत्र गुणपत्रिका प्रदान करण्यात येत नसेल त्या ठिकाणी संबंधित विद्यापीठ/संस्था यांनी स्वतंत्ररित्या पदवी परीक्षेचे गुण उपलब्ध करुन दिले असतील तर ते गुण अन्यथा पदव्युत्तर पदवी चे गुण ग्राह्य धरण्यात येतील.हिच कार्यवाही पीएचडी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या आणि परदेशातील विद्यापीठामधून पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या विद्यार्थ्यांच्याबाबतीत लागू राहिल. |

| | | |
|---|---|---|
| | इत्यादी केंद्र/ राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था मधून शैक्षणिक अर्हता निर्धारित गुणासह उत्तीर्ण केली असल्यास ग्राह्य धरण्यात येईल किंवा कसे. | |
| ५ | शासन निर्णयात एचएससी या परीक्षांचा उल्लेख आहे. तथापि काही उमेदवार एसएससीनंतर पदविका अभ्यासक्रम करतात व त्यानंतर अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतात,या उमेदवारांनी एचएससी केलेले नाही. | उमेदवारांनी एसएससीनंतर पदविका अभ्यासक्रम करून अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल अश्या उमेदवारांच्या बाबत पदविका अभ्यासक्रमाचे गुण विचारात घेण्यात यावेत. |
| ६ | शासन निर्णयासोबतचे परिशिष्ट-ब मधील<br>१. सर्वसाधारण अटी व शर्ती मध्ये क्र.२ वर विद्यार्थ्याला परदेशातील THE / QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा. अशी तरतूद आहे. | THE व QS यांच्या संकेतस्थळावर करीताचे उपलब्ध असलेले अद्यावत (२०१९) Rankings विचारात घेण्यात यावे. |
| ७. | विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली परदेशातील शैक्षणिक संस्था / विद्यापीठ THE व QS वर्ल्ड रॅन्कींगमध्ये ..... उपलब्ध | विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली परदेशातील शैक्षणिक संस्था / विद्यापीठ THE व QS वर्ल्ड रॅन्कींगमध्ये उपलब्ध नसल्यास ग्राह्य धरण्यात येणार नाही. अशा उमेदवारास |

| | | |
|---|---|---|
| | नसल्यास. | अपात्र समजण्यात यावे. |
| ८ | मागास प्रवर्गातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकतात काय ? | होय, मात्र परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याकरीता / ज्यांना त्यांचेशी संबंधित प्रशासकीय विभागाची योजना लागू आहे असे विद्यार्थी वगळून उर्वरित विद्यार्थी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या योजनेकरीता अर्ज करु शकतील.<br><br>उदा :-१. विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गासाठी चालू शैक्षणिक वर्षाकरिता परदेशी शिष्यवृत्तीची योजना लागू नाही त्यामुळे या प्रवर्गामधील रुपये २०.०० लक्ष पर्यंत कुटुंबाचे उत्पन्न असलेल्या विद्यार्थी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.<br><br>२. QS World Ranking १०१ ते २०० असलेल्या विद्यापीठात प्रवेश घेतलेले आणि रुपये ६.०० लक्ष पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेले अनुसूचित जाती प्रवर्गाचे विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.<br><br>३. अनुसुचित जमाती प्रवर्गामधील रु.६.०० लक्ष पेक्षा जास्त उत्पन्न मर्यादा असलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. |
| ९ | शासन निर्णयातील परिशिष्ट-ब क्र ७. अर्ज करण्यासाठी अनिवार्य अटी मधील क्र. ८ प्रमाणे :- | परदेशी शैक्षणिक संस्थांकडून दिलेल्या ऑफर लेटर मध्ये शैक्षणिक स्वरूपाच्या Conditions असल्यास आणि त्या पूर्ण केल्याबाबतची कागदपत्रे विद्यार्थ्याने सादर |

| | | |
|---|---|---|
| | ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही अशी तरतूद आहे.<br><br>मात्र उमेदवारास दिलेल्या Offer Letter मध्ये काही Conditions असल्यास, तसेच उमेदवाराने प्रवेश घेतला असल्यास. | केली नसल्यास अधिष्ठाता प्राध्यापक (आंतरराष्ट्रीय प्रवेश), आय.आय.टी., पवई, मुंबई यांच्या सल्ल्याने सदर विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र समजण्याबाबत छाननी समितीने निर्णय घ्यावा. त्यासाठी आवश्यकतेनुसार छाननी समितीच्या बैठकांमध्ये त्यांना विशेष निमंत्रित म्हणून बोलविण्यात यावे. |
| १० | अर्ज करीत असलेले बहुतांश उमेदवार या वेळेस त्यांनी प्रवेश घेतलेल्या परदेशी विद्यापीठात आहेत. स्वतः अर्ज सादर करण्यास विभागीय कार्यालयात उपस्थित राहू शकत नाही. | अर्ज सादर करण्यास विद्यार्थी स्वतः येवू शकणार नसेल अश्या परिस्थितीत तो त्याच्या पालकास किंवा कुटुंबातील इतर व्यक्तीस Authority Letter देवून प्राधिकृत करू शकेल.<br><br>प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीने उमेदवाराने भरलेल्या व स्वाक्षरी असलेल्या अर्जाची व Authority Letter ची प्रत (Printout) विभागीय कार्यालयाकडे सादर केल्यास अर्ज ग्राह्य धरण्यात यावा. |
| ११ | एसएससी, एचएससी,पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका बाबत काही ठिकाणी Grade/GPA दिले असल्यास. | गुणपत्रिकेत Grade /GPA इत्यादी स्वरुपात नोंद असेल तर टक्केवारी दर्शविलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे अथवा Grade वरून टक्केवारी काढण्यासाठीचा संबंधित बोर्ड /विद्यापीठ यांनी दिलेला फॉर्मुला सादर करणे आवश्यक आहे. असा फॉर्मुला प्रमाणपत्राच्या ज्या बाजूवर अंकित आहे त्या बाजूची |

| | | |
|---|---|---|
| | | साक्षांकित प्रत सुद्धा अर्जासोबत जोडण्यात यावी. अन्यथा गुणांची टक्केवारी उपलब्ध नाही असे समजण्यात यावे. |
| १२ | शासन निर्णयातील परिशिष्ट-ब मधील क्र १. सर्वसाधारण अटी व शर्ती मध्ये विद्यार्थी व विद्यार्थ्याचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत. असे नमूद आहे. नागरिकत्वासाठी प्रमाणपत्र सादर करताना Passport, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला ज्याचेवर जन्म ठिकाणाची/ राष्ट्रीयत्वाची नोंद आहे असे पर्याय घेण्यात यावेत किवा कसे. | नागरिकत्वासाठी केवळ सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावेत. |

२. संचालक, तंत्र शिक्षण यांनी या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( संजय औ. धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, आय.आय.टी., पवई, मुंबई
४. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
६. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. निवडनस्ती/तांशि-४